

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या रोजगार-स्वयंरोजगार विभागाच्या वतीने चांदिवली विधानसभा अध्यक्ष दिलीप लांडे यांच्या नेतृत्वाखाली रविवारी कुर्ला (पश्चिम) येथे करिअर आणि नोकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. रोजगार-स्वयंरोजगार विभागाचे अध्यक्ष सुनील बसाखेत्रे, सरचिटणीस अनिल शिदोरे यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी विभाग संघटक विजय चव्हाण, अशोक खरोटमल, अभंगराव नांगरे उपस्थित होते.

११ | पुढारी |
* सोमवार, ५ एप्रिल २०१०

# मनसेचे मराठी तरुणांसाठी राज्यात रोजगार मेळावे

## मुंबईतील २ हजार तरुणांना ऑन द स्पॉट नोकरी

प्रतिनिधी

महाराष्ट्रातील उद्योग आणि व्यवसायावर परप्रांतीयांचे वर्चस्व असल्याने मराठी तरुणांना डावलून ते अमराठींना नोकऱ्या देत आहेत. त्यांची ही कृती बेकायदेशीर असतानाही राज्य सरकार त्यांच्यावर काहीही कारवाई करीत नाही. त्यामुळे मराठी तरुणांना रोजगार देण्याची जबाबदारी मनसेने घे-तली असून, यापुढे त्यांच्यासाठी राज्यात करिअर व मार्गदर्शन मेळावे आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा मनसेचे सरचिटणीस अनिल शिदोरे यांनी केली.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने कुर्ला येथे आयोजित केलेल्या करिअर मेळाव्यात त्यांनी ही घोषणा केली. मनसेचे चांदिवली विभाग अध्यक्ष दिलीप लांडे यांनी काजुपाडा येथील सेंट ज्युडस हायस्कूल मैदानात या मेळाव्याचे आयोजन केले होते. मुंबईतील हजारो सुशिक्षित तरुण या मेळाव्यात सहभागी झाले होते. शैक्षणिक गुणवत्तेनुसार त्यांना विविध आस्थापनांमधील अधिकाऱ्यांनी मुलाखत घेऊन दोन हजार मराठी तरुणांना त्यांना ऑन द स्पॉट रोजगार दिला.

रिलायन्स कम्युनिकेशन, टाटा, ऑक्सफर्ड वेब डिझाईनिंग, जेटकिंग, सर्की बीपीओ, स्पीकवेल, कीर्ति कम्प्युटर, महिला आर्थिक महामंडळ इत्यादी आस्थापनांच्या अधिकाऱ्यांनी उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतल्या.

मनसेच्या रोजगार व स्वंयरोजगार कक्षाचे अध्यक्ष सुनील बसाखेत्रे हे प्रमुख पाहुणे म्हणून या मेळाव्याला उपस्थित होते. पक्षाचे स्थानिक पदाधिकारी विजय चव्हाण, उपविभाग संघटक अशोक खरटमोल, अभंगराव नांगरे, चंद्रप्रभा मोरे आदी पदाधिकाऱ्यांनी हा मेळावा यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.



मनसेचे चांदिवली विधानसभाध्यक्ष दिलीप लांडे यांच्या नेतृत्वाखाली सुशिक्षित बेरोजगारांसाठी करिअर व नोकरी मेळाव्याचे आयानेज कुर्ला येथे करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन सरचिटणीस अनिल शिदोरे यांनी केले. या कार्यक्रमासाठी मनसेचे सरचिटणीस शिरीष सावंत, उपाध्यक्ष वागिश सारस्वत, वाहतूक सेनाध्यक्ष हाजी अराफत शेख आदी मान्यवर उपस्थित होते.



रविवारी मनसेचे सरचिटणीस अनिल शिदोरे व रोजगार-स्वयंरोजगार अध्यक्ष
आले.

# मनसेच्या रोजगार मेळाव्याला युवकांची गर्दी

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. ४ : महाराष्ट्र हे औद्योगिक राज्य असून युवकांना चांगल्या नोकऱ्या मिळाव्यात. नोकऱ्या उपलब्ध असून पुरेशी माहिती नसणे, उद्योग व व्यवसायाबाबत आर्थिक सहाय्य व कायद्याची माहिती करून देणे, शिक्षण व प्रशिक्षणाबरोबरच उद्योग-व्यवसायाचे महत्त्व पटवून देण्यासाठी मार्गदर्शन करणारा करिअर व नोकरी मेळावा आयोजित करणे हा एक अतिशय चांगला सामाजिक उपक्रम असल्याचे मत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस अनिल शिदोरे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे माध्यम प्रायोजक 'सकाळ' होते.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना, चांदिवली विधानसभा विभाग अध्यक्ष दिलीप लांडे यांच्या नेतृत्वाखाली, रोजगार-स्वयंरोजगार विभागाच्या वतीने रोजगार मेळावा आयोजित केला होता. आजच्या स्पर्धेच्या व आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात वाढत्या बेरोजगारीला पायबंद घालण्यासाठी व सुशिक्षित तरुणवर्गाला नवीन दिशा देण्यासाठी करिअर व नोकरी-मेळाव्याचा उद्‌घाटन सोहळा सरचिटणीस अनिल शिदोरे व रोजगार-स्वयंरोजगार अध्यक्ष सुनील बसाखेत्रे यांच्या हस्ते सेंट ज्युड्स हायस्कूल मैदान, काजुपाडा, कुर्ला (प.) येथे झाला. या करिअर व नोकरी मेळाव्याला युवकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. १० व १२ मधील विद्यार्थ्यांना पुढील दिशा देण्यासाठी करिअर मार्गदर्शन केले असून विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास मनसेचे सरचिटणीस शिरीष सावंत, उपाध्यक्ष वागिश सारस्वत, तसेच वाहतूक सेना अध्यक्ष हाजी अरफात शेख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या करिअर व नोकरी मेळाव्यात रिलायन्स कम्युनिकेशन, टाटा जी ४ एस, ऑक्सफर्ड वेब डिझाइनिंग, जेटकिंग, सर्को बीपीओ, स्पीकवेल इंग्लिश ॲकॅडमी, कीर्ती कॉम्प्युटर, हिंदुस्थान मायक्रो फायनान्स, महिला आर्थिक महामंडळ, युरेका फोर्ब्स् यांसारख्या ४० नामवंत इन्स्टिट्यूट व कंपन्यांसह हजारो विद्यार्थी व सुशिक्षित बेरोजगार सहभागी झाले. या मेळाव्यात २८०० सुशिक्षित बेरोजगार व विद्यार्थी सहभागी झाले.

या प्रसंगी विभाग अध्यक्ष दिलीप लांडे, तसेच आयोजक रोजगार-स्वयंरोजगार विभागाचे विभाग संघटक विजय चव्हाण, उपविभाग संघटक अशोक खरटमोल, हंडि, संयोजक उपविभाग अध्यक्ष अभंगराव नांगरे, नाना भिताडे, गणेश चव्हाण, दत्ता पाटील, शाखा अध्यक्ष राजू साळवी, अशोक माटेकर, अशोक जाधव, बाळ गुरव, राजेंद्र पाटील, गोविंद खरटमोल, सॅड्रिक डिसोझा तसेच महिला विभाग अध्यक्षा चंद्रप्रभा मोरे तसेच सर्व महिला पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनसेच्या रोजगार मेळाव्यातून युवकांना नोकरीची संधी



मुंबई, दि. ४ - महाराष्ट्र नवनिर्माण सेना, चांदिवली विधानसभा, विभाग अध्यक्ष दिलीप लांडे यांच्या नेतृत्त्वाखाली रोजगार-स्वयंरोजगार विभागाच्यावतीने आजच्या स्पर्धेच्या, आधुनिक -तंत्रज्ञानाच्या युगात वाढती बेरोजगारी लक्षात घेऊन वाढल्या बेरोजगारीला वेळीच पायबंद घालण्यासाठी व सुशिक्षित तरुण वर्गाला नवीन दिशा देण्यासाठी करिअर व नोकरी मेळाव्याचा भव्य उद्घाटन सोहळा काल सरचिटणीस अनिल शिदोरे व रोजगार-स्वयंरोजगार अध्यक्ष सुनील बसाखेत्रे यांच्या शुभहस्ते सेंट ज्युड्स हायस्कुल मैदान, काजुपाडा, कुर्ला (प.) येथे संपन्न झाला. या करिअर व नोकरी मेळाव्याला युवकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून, मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. तसेच इयत्ता १० व १२ वीमधील विद्यार्थ्यांना पुढील दिशा देण्यासाठी करिअर मार्गदर्शन करण्यात येत असून, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांची सेमिनार्स होत आहे.

या मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी सरचिटणीस अनिल शिदोरे यांनी महाराष्ट्र हे एक औद्योगिक राज्य असून, युवकांना चांगल्या नोकऱ्या मिळाव्यात, नोकऱ्या उपलब्ध असून पुरेशी माहिती, उद्योग व व्यवसायाबाबत आर्थिक साह्य व कायद्याची माहिती, शिक्षण व प्रशिक्षण तसेच उद्योग-व्यवसायांचे जास्त महत्त्व पटवून देणारा व मार्गदर्शन करणारा करिअर व नोकरी मेळावा हा एक अतिशय चांगला सामाजिक प्रकल्प आहे.

या करिअर व नोकरी मेळाव्यात रिलायन्स कम्युनिकेशन, एल. आय. सी., बिर्ला इन्सुरन्स, टाटा जी ४ एस, क्रिस्टल, ऑक्सफर्ड वेब डिझायनिंग, स्पीकवेल इंग्लिश ॲकॅडमी, कीर्ती कॉम्प्युटर, हिंदुस्थान मायक्रो फायनान्स, महिला आर्थिक महामंडळ यासारख्या ४० नामवंत इन्स्टिट्युट व कंपन्यांसह हजारो विद्यार्थी व सुशिक्षित बेरोजगार सहभागी झाले होते.

सदर करिअर व नोकरी मेळावा २ दिवसीय असून, रविवार ४ एप्रिल सायंकाळी ६ पर्यंत चालू होता. तरी चांदिवलीमधील सुशिक्षित बेरोजगारांनी तसेच विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहून मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला.. सदर प्रसंगी विभाग अध्यक्ष दिलीप लांडे, सोबत आयोजक रोजगार-स्वयंरोजगार विभागाचे विभाग संघटक विजय चव्हाण, उपविभाग संघटक अशोक खारटमोल, हांडे, संयोजक उपविभाग अध्यक्ष अभंगराव नांगरे, नाना भिंताडे, गणेश चव्हाण, दत्ता पाटील, शाखा अध्यक्ष राजू साळवी, अशोक माटेकर, अशोक जाधव, बाळ गुरव, राजेंद्र पाटील, गोविंदर खारटमोल, सॅड्रीक डिसोझा तसेच महिला विभाग अध्यक्षा चंद्रप्रभा मोरे, सर्व महिला पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.